**Ref. No.** **Date :**

**( लहान व्यावसायिक कर्जदारांसाठी )**

**प्रति,**

____________________________

____________________________

____________________________

**विषय : Resolution Framework - 2.0 अंतर्गत लहान व्यावसायिक (Small Businesses) यांच्या कर्जखात्यांचे पुनर्बांधणी (Restructuring) बाबत.**

**संदर्भ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे दि.05/05/2021 रोजीचे परिपत्रक क्र.RBI/2021-22/31 DOR.STC.REC. 11/21.04.048/ 2021-22.**

**महोदय,**

गतवर्षी कोव्हिड-१९ या कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेल्या लॉकडाऊन निर्बंधांमुळे कर्जदारांच्या उत्पन्नावर झालेला परिणाम विचारात घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी दि.१ मार्च २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२० या सहा महिन्यांसाठी कॅश क्रेडीट कर्जांवरील व्याज भरण्यास स्थगिती (Deferment) तसेच मुदत कर्जासाठी हप्ते व व्याज भरणेसाठी विश्रांती कालावधी (Moratorium Period) देणेबाबत सूचित केलेले होते. त्यानुसार बँकेने कार्यवाही केलेली आहे.

चालू वर्षी माहे फेब्रुवारी-मार्च 2021 पासून कोव्हीड-19 ची दुसरी लाट मोठ्या प्रमाणात आली आहे. त्यामुळे शासनाने पुन्हा लॉकडाऊनचे विविध निर्बंध लागू केलेले असून, त्याचा नकारात्मक परिणाम उत्पन्नावर होत आहे. याचा विचार करून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वरील संदर्भीय परिपत्रकानुसार लहान व्यावसायिक यांचे कर्जखात्यांची पुनर्बांधणी (Restructuring) करणेबाबतचा पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार लहान व्यावसायिक कर्जखात्यांचे Restructuring करण्याबाबतचे धोरण बँकेने तयार केले आहे. सदरचे धोरण बँकेने बँकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेले आहे. **कोव्हिड-१९ मुळे आपल्या उत्पन्नावर विपरीत परिणाम झाला असेल आणि त्याबाबतचा कागदोपत्री तपशील उपलब्ध असेल तरच आपणांस सदर पर्यायाचा लाभ घेता येईल.** सदरची प्राथमिक पात्रता पूर्ण होत असल्यास, खालील निकष व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर आपल्या कर्जखात्यांचे Restructuring बाबतचा अंतिम निर्णय बँक घेईल व तो आपल्यावर बंधनकारक असेल.

## अ) Restructuring साठी पात्रतेचे निकष –

a) फक्त कोव्हिड-१९ मुळे आपल्या व्यवसायावर/उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झालेला असणे आवश्यक आहे.

b) आपले कर्जखाते दि.३१ मार्च २०२१ रोजी Standard Asset वर्गीकरणामध्ये असणे आवश्यक आहे.

c) आपण Restructuring साठी सादर केलेला प्रस्ताव बँकेने मान्य केलेल्या तारखेस (Date of Invocation) आपल्या कर्जखात्यांचे वर्गीकरण Standard Asset असणे आवश्यक आहे.

..२..

d) आपण सर्व वित्तीय संस्थांकडून घेतलेली फंडेड आणि नॉन फंडेड मर्यादासह कर्जे (Exposure) दि.३१ मार्च २०२१ रोजी रू.२५.०० कोटींपर्यंत असणे आवश्यक आहे.

e) Restructuring साठी फक्त व्यावसायिक कारणांसाठी घेतलेली कर्जे पात्र असतील. यामध्ये शेती व्यवसायासाठीची कर्जे पात्र राहणार नाहीत.

**ब) Resolution Framework - 2.0 अंतर्गत कर्जखात्यांचे Restructuring साठी कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांच्या सहीनिशी, आपण सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये अर्ज (सर्व आवश्यक कागदपत्रांसह) दि.१५ जुलै २०२१ पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.**

भागीदारी संस्थेबाबत - अर्जावर सर्व भागीदारांच्या सह्या असणे आवश्यक.

कंपनीबाबत - सह्यांचा अधिकार असणाऱ्या अधिकृत व्यक्तींच्या अर्जावर सह्या असणे आवश्यक.

**क) अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे -**

१. आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० साठीचे ऑडीटेड नफा-तोटा पत्रक, ताळेबंद व आयकर विवरणपत्रक तसेच आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीचे टेंटेटीव्ह/ऑडीटेड नफा-तोटा पत्रक, ताळेबंद.

२. माहे ऑक्टोबर २०२० ते एप्रिल २०२१ या कालावधीतील जी.एस.टी. विवरण पत्र सादर केल्याचे पुरावे व विवरणपत्राची प्रत (लागू असल्यास).

३. माहे ऑक्टोबर २०२० ते एप्रिल २०२१ या कालावधीतील दरमहाची खरेदी व विक्री यांची महिनावार आकडेवारी.

४. एकूण कर्जांचा विचार करता, बँक नियमांनुसार जादा तारण आवश्यक असल्यास त्याबाबतचा तपशील.

५. कर्ज पुनर्बांधणीसाठीचा प्रकल्प अहवाल (Project Report for Restructuring) तसेच प्रकल्प अहवालामध्ये खालील बाबींचा तपशील असणे आवश्यक आहे -

- कोव्हिड-१९ च्या दुसऱ्या लाटेमुळे व्यवसाय व उत्पन्नावर काय, कसा, किती परिणाम झाला? याचा सविस्तर तपशील.
- व्यवसाय व उत्पन्नावर झालेला परिणाम सौम्य, मध्यम अथवा तीव्र असल्याची माहिती.
- व्यवसाय व उत्पन्न यामध्ये सुधारणा, वाढ होणेसाठी काय उपाययोजना केली आहे, यापुढे काय करणार आहे, याची माहिती.
- व्यवसाय व उत्पन्न कोव्हिड-१९ च्या आधीच्या पातळीवर (पूर्ववत) कधी होईल, याची सविस्तर माहिती.
- एकापेक्षा जास्त कर्जखात्यांची पुनर्बांधणी करावयाची असल्यास प्रत्येक कर्जखात्यासाठी कर्जपरतफेडीसाठी असणारी मुदत, जास्तीत जास्त दोन वर्षे वाढविता येईल (कोणत्याही परिस्थितीत कर्जखाती एकत्रित करता येणार नाहीत). त्याप्रमाणे परतफेडीसाठी अपेक्षित हप्ता पध्दतीची मागणी करावी.

..३..

- कर्ज परतफेडीसाठी विश्रांती कालावधी/वाढीव मुदत आवश्यक असल्यास जास्तीत जास्त २ वर्षांचा विचार करावा.
- कर्ज परतफेडीसाठी अपेक्षित वाढीव कालावधीपर्यंतची प्रोजेक्टेड आर्थिक पत्रके तसेच या अनुषंगाने गृहीत धरलेल्या बाबींचा तपशील.

६. भागीदारी संस्थेबाबत भागीदारीमध्ये कोणताही बदल नसलेबाबतचे सर्व भागीदारांच्या सह्या असलेले घोषणापत्र तसेच अद्ययावत भागीदारी नोंदणी दाखला.

७. कंपनीच्या बाबतीत कर्ज पुनर्बांधणीबाबत व सर्व कागदपत्रांवर सह्या करण्याचे अधिकार असल्याचे संचालक मंडळ ठरावाची प्रत व कंपनीच्या मेमोरॅण्डम ॲण्ड आर्टिकल्स ऑफ असोसिएशन मध्ये कोणताही बदल नसलेबाबतचे घोषणापत्र देणे बंधनकारक राहील. तसेच सर्व कागदपत्रांवर कंपनीचे कॉमन सील उमटविणे बंधनकारक राहील.

वरील कागदपत्रांची पूर्तता करून आपल्या व्यावसायिक कर्जखात्यांचे Restructuring साठीचा प्रस्ताव **सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यामध्ये** शाखेस **दि.१५ जुलै २०२१ पूर्वी** सादर करावा. तद्नंतर आलेल्या प्रस्तावाचा विचार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

याबाबत आपणांस काही शंका/मार्गदर्शन हवे असल्यास शाखाव्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा, ही विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

**( सीए. दिलीप गुरव )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**कर्जदाराची सही :** ____________________